# चौकशी अधिकारी श्री. सुरज मांढरे, उप आयुक्त (भूमी आणि जिंदगी) यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालामधील निष्कर्षांवरील आमचा अभिप्राय

१) **सदर निविदा प्रक्रिया राबवितांना राज्य शासनाच्या शासन निर्णय क्र. भां.र.व.स. १०८८/(२५१२)/उद्योग-६ दि. २ जानेवारी १९९२ च्या आदेशाचे शिक्षण मंडळाने पालन केले आहे का असा प्रश्न आहे.**

याबाबत मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ च्या तरतूदींना अधीन राहून यथास्थिती या शासन निर्णयाचे पालन केले असल्याचे शिक्षण यांनी नमूद केलेले आहे. या खुलाशावर चौकशी अधिकारी यांनी उपरोक्त अधिनियमातही राज्य शासनाचे आदेश राजपत्रांचे पालन शिक्षण मंडळाने करणे आवश्यक असल्याचे जे मत व्यक्त केले आहे ते योग्य असून यापुढे त्याचे पालन शिक्षण मंडळाने करणे आवश्यक आहे.

२) **२ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार वार्षिक खरेदी २००० रूपयांपेक्षा जास्त असेल तर शासन राजपत्रात जाहीरात देणे बंधनकारक आहे. याची पुर्तता शिक्षण मंडळाने केली नसल्याबाबत तक्रार आहे.**

शिक्षण मंडळाने उपरोक्त शासन निर्णयातील अनुक्रमांक १०.८ नुसार जिल्हा व स्थानिक स्तरावरून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रात निविदा जाहीरात प्रसिद्ध केली असल्याबाबतचा खुलासा केलेला आहे. यापुढे शासन राजपत्रात जाहीरात देण्याची दक्षता घेण्यात येणार असल्याचे शिक्षण प्रमुख यांनी मान्य केले आहे.

३) **खरेदीसाठी शिक्षण मंडळाने निविदा समिती नेमली होती का असा प्रश्न आहे.**

या प्रश्नावर तशी समिती गठीत केली जात नसून त्याऐवजी सर्व निविदांची कार्यवाही शिक्षण मंडळाचे उपस्थितीत करण्यात येते असा खुलासा शिक्षण प्रमुख यांनी केला आहे. निविदा प्रक्रियेमध्ये समिती गठीत करून अशा समितीमध्ये त्या-त्या विषयाशी संबंधित तज्ञ व्यक्तींचा समावेश केल्यास त्यामुळे निविदा प्रक्रिया उत्तमरितीने पार पाडता येते असे आमचे मत आहे.

४) **कोणत्याही कंपनीचे नाव देवून निविदा मागविता येतात का,कोणत्या कंपन्या नामवंत आहेत हे शिक्षण मंडळामध्ये कोणी व कशाच्या आधारावर ठरविले असा प्रश्न आहे.**

या प्रश्नाला केलेल्या खुलाशात मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे नियम ५६ नुसार दस्तऐवज (स्पेसिफिकेशन) ठरविण्याचा अधिकार सभापतींना असल्याने त्यानुसार त्यांनी बाजारात प्रचलित असलेल्या दर्जेदार कापडाच्या कंपन्यांचा विचार करून नांवे ठरविले असल्याचा खुलासा केला आहे. मात्र ज्या बैठकीमध्ये ही नांवे ठरविले गेले त्या बैठकीचा इतिवृत्त चौकशी अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. तसेच अंतिम खुलाशाच्या वेळी देखील हे इतिवृत्त सादर

करण्यात आलेले नाही. कोणत्या कंपनीची निविदा मान्य करावयाची याचा निर्णय प्रचलित पद्धतीनुसार शिक्षण मंडळ घेत असेल तर त्यानुसार ज्या बैठकीत गणवेष, बूट वगैरे खरेदीचा निर्णय झाला त्याचे इतिवृत्त ठेवणे कार्यालयीन कार्यपद्धतीच्या दृष्टीने अनिवार्य होते. परंतु ही दक्षता घेतल्याचे दिसत नाही.

५) **शासन निर्णयानुसार ३ आठवडयांचा कालावधी देणे आवश्यक असतांना त्याची पूर्तता केली नसल्याबाबतचा प्रश्न आहे.**

विद्यार्थ्यांना लवकर गणवेष देण्याच्या उद्देशाने निविदा कालावधी ३ आठवडयांचा न करता मध्यम मुदतीचा केल्याचे शिक्षण प्रमुख यांचे म्हणणे आहे. आताच्या निविदातील अ पाकीट उघडल्यानंतर वर्कऑर्डर देण्याकरीता ४७ दिवसांपेक्षा अधिक कालावधी लागल्याबाबत शिक्षण प्रमुख यांनी निविदा कार्यपद्धती ही अन्य खात्यांशी संबंधित असल्याचे जे कारण नमूद केले आहे. त्यात कोणत्या अन्य कार्यालयांमुळे विलंब झाला ते स्पष्ट केलेले नाही. शिक्षण मंडळाकडील कामकाजाचे लेखापरिक्षण हे शासनाकडील संबंधित खात्याकडून केले जाते. महापालिकेच्या अंतर्गत अर्थान्विक्षक विभागाकडे अशी प्रकरणे तपासण्याकरीता सादर होत नाहीत. त्यामुळे कोणत्या कार्यालयामुळे वर्कऑर्डर देण्यास विलंब झाला याचा बोध होत नाही हे पाहता आमच्या मते या विभागास शिक्षण मंडळच जबाबदार आहे.

६) **शासन निर्णयानुसार निविदा उघडतांना निविदाकारांना पूर्वसूचना देणे बंधनकारक असतांना त्याचे पालन शिक्षण मंडळाने केले आहे का असा प्रश्न आहे.**

निविदा पद्धती ही दोन पाकीट पद्धतीने झालेली आहे. पाकीट क्र. १ सर्व निविदाधारकांसमोर उघडले गेले. मात्र ब पाकीट म्हणजेच पाकीट क्र. २ उघडतांना संबंधित निविदाधारकांना बोलविले गेलेले नाही. ही पाकीटे उघडण्याचा निर्णय घेण्यासाठी शिक्षणमंडळाची दि. ३१/०७/२००८ रोजी खास सभा बोलाविली गेली असल्याचे दिसून येते. अशी खास सभा बोलाविण्याकरीता जर वेळ होता तर संबंधित निविदाधारकांना ते का बोलावू शकले नाहीत हे स्पष्ट होत नाही. सदरची बाब निविदा प्रक्रियेशी सुसंगत झालेली नाही.

७) **ज्या वस्तूंची खरेदी करावयाची त्याचे एस्टीमेट व डिझाईन कोणी व कशाच्या आधारे ठरविले, निविदा जाहीरात देण्यापूर्वी वस्तूंच्या दरांच्या बाजारभावाची चौकशी केली होती का असा प्रश्न आहे.**

विषयांकित खरेदी करण्यापूर्वी खरेदी करावयाच्या वस्तूंचा दर्जा व किंमत याबाबत संबंधित कंपनी किंवा पुरवठादाराकडून पत्रव्यवहार करून माहिती उपलब्ध करून घेतलेली दिसत नाही. याबाबत शिक्षण प्रमुख यांनी केलेला लेखी खुलासा व चौकशी अधिकारी यांना चौकशीचे वेळी दिलेली माहिती यात विसंगती दिसून येते. वास्तविक ज्या वस्तूंची खरेदी करावयाची आहे त्या वस्तूंचे दर आणि दर्जा याबाबत नामवंत कंपन्यांकडून माहिती घेवून त्या आधारे पूर्वगणनपत्रक करणे योग्य झाले असते. तशी कार्यवाही विषयांकीत निविदा काढण्यापूर्वी झालेली नाही.

८) **जाहिरातीमध्ये किंवा निविदा संचामध्ये किती वस्तू खरेदी करावयाच्या आहेत याचा उल्लेख दिसून येत नाही. खरेतर वस्तूच्या गुणवत्तेबरोबरच संख्येवरही तिची किंमत ठरत असते मग संख्येचा उल्लेख का नाही ?**

शिक्षण मंडळाकडे विद्यार्थी संख्येचा आकडा उपलब्ध आहे. त्याच्या आधारे निविदामध्ये खरेदीचे प्रमाण (नग) नमूद करणे त्यांना शक्य होते. साधारणत: वस्तूंची खरेदी मोठया प्रमाणात असेल तर कंपन्या दरामध्ये सवलत देवून माल पुरवितात. मात्र शिक्षण मंडळाने निविदेमध्ये खरेदीचे प्रमाण नमूद केलेले नाही. व सदरची बाब अनावधानाने झाली असल्याबाबत शिक्षण प्रमुख यांनी केलेला खुलासा पटणारा नाही.

९) **ज्या निविदा मंजूर करण्यात आल्या त्याची कारणे काय, ती कारणे २ जानेवारी १९९२ च्या नियमानुसार योग्य आहेत काय ?**

निविदाधारकांना अपात्र ठरवितांना जे निकष लावले गेले त्यात प्राथमिक व दुय्यम असा भेद केला गेला आहे. उदा. समर्थ को.ऑप कन्झूमर्स सेंट्रल स्टोअर्स यांनी प्राथमिक अटींचे म्हणजे बयाणा रक्कम न भरल्यामुळे त्यांचे पाकीट क्र. २ उघडण्यात आलेले नाही. दुसरीकडे गिरी फॅब यांनी शॉप ॲक्ट संदर्भात सादर केलेले कागदपत्रे समाधानकारक नसताना सदरची बाब दुय्यम समजून त्यांना पात्र ठरविले गेले. अशा प्रकारे "अ" पाकीट उघडतांना विहित निकषामध्ये प्राथमिक निकष व दुय्यम निकष असा फरक करण्याचे कारण दिसून येत नाही व तसे का केले गेले त्याचा समाधानकारक खुलासाही शिक्षण प्रमुख यांनी केलेला नाही. त्यामुळे ज्या निकषानुसार काही निविदादार अपात्र ठरविले गेले त्याच निकषामध्ये काही निविदादार बसत नसतांना पात्र ठरविले गेले ही बाब सुद्वा निविदा प्रक्रियेशी सुसंगत नाही.

१०) **शासन परिपत्रक दि. १४ ऑक्टोबर १९८६ नुसार भारतीय मानक संस्थेने चिन्हांकीत वस्तू खरेदी करणे बंधनकारक आहे व ज्या वस्तू चिन्हांकीत केलेल्या नाहीत त्यासंदर्भात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन शिक्षण मंडळाने केले आहे का ?**

उपरोक्त दोन्ही शासन निर्णयानुसार गणवेष, बूट, सॉक्स, इ. वस्तूंची लघुउद्योजक आणि उत्पादक कंपनीच्या निविदाकारांच्या वस्तू स्पर्धात्मक दराने खरेदी करण्याची कार्यवाही झाली असे शिक्षण प्रमुख यांचे म्हणणे आहे. तथापी विषयांकीत मालाची खरेदी करताना शासनाच्या २ जानेवारी १९९२ च्या निर्णयाची संपूर्ण अंमलबजावणी झालेली नसल्याचा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढला आहे. सदर निष्कर्ष शिक्षण प्रमुख यांनी पूर्णत: फेटाळलेला नाही याचा अर्थ उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे सर्व मालाची खरेदी झाली नाही असा होतो.

११) **२ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार २ लिफाफे पद्वतीसंदर्भात घ्यावयाची दक्षता शिक्षण मंडळाने घेतली आहे काय ?**

शिक्षण मंडळाने शासनाच्या २ जानेवारी १९९२ च्या निर्णयाप्रमाणे दोन लिफाफे पद्वतीने निविदा काढल्या मात्र पाकीट क्र. २ ( ब पाकीट ) उघडतांना संबंधित ठेकेदारांनाही बोलाविले नाही व या

निविदांचा निर्णय खास बाब म्हणून शिक्षण मंडळाने घेतल्याचे जे कारण दिले आहे ते नमूद करताना खास बाब म्हणजे नेमके काय याचा खुलासा केलेला नाही. त्यामुळे शिक्षण प्रमुख यांचा खुलासा समाधानकारक वाटत नाही.

१२) **कापड खरेदी यंत्रमाग महाराष्ट्र राज्य महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना व महामंडळाने तशी तयारी दाखविली असतांनाही त्याकडे दुर्लक्ष का करण्यात आले?**
यंत्रमाग महाराष्ट्र राज्य महामंडळ यांनी शिक्षण मंडळाला यापूर्वी गणवेषाकरीता पुरविलेल्या कापडामध्येही काही प्रमाणात कमी दर्जाचे कापड पुरविलेले होते. तसेच पुरवठा करताना त्यास विलंबही लावला होता असा खुलासा शिक्षण प्रमुख यांनी केलेला आहे. तथापी निविदा ही तयार गणवेषाकरीता काढण्यात आली होती त्यामुळे यंत्रमाग महामंडळाकडून जरी कापड खरेदी झाली असती तरी पुन्हा गणवेष शिलाईकरीता काही कालावधी द्यावा लागला असता. हे पाहता तक्रार विचारात घेणेची आवश्यकता नाही.

१३) **लघुउद्योगांनी स्वत:च उत्पादित केलेल्या मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. शिक्षण मंडळ खरेदी करीत असलेल्या सर्वच वस्तू लघुउद्योगांसाठी आरक्षित आहेत. अशा स्थितीत सर्व निविदाकार स्वत:च उत्पादक आहेत याची खातरजमा शिक्षण मंडळाने कशी करून घेतली?**
लघुउद्योजकांनी स्वत:च उत्पादित केलेल्या मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. शिक्षण मंडळ खरेदी करीत असलेल्या सर्वच वस्तू लघु उद्योजकांसाठी आरक्षित आहेत अशा स्थितीत सर्व निविदाकार स्वत:च उत्पादक आहेत याची खातरजमा शिक्षण मंडळाने केली नसल्याचे आढळून येते. तसेच त्याबाबत समाधानकारक कारणही दिलेले नाही.

१४) **जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार गणवेष (रेडिमेड गारमेंट्स) लेदर व पी.व्ही.सी. शूज, वह्या, पाट्या, कॉटन होजिअरी, लेखन साहित्य, रेखा व गणिती उपकरणे, इ. वस्तू लघुउद्योगांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित आहेत. (परिशिष्ट ११) या बाबींचा विचार निविदा प्रक्रिया राबवितांना केला का?**
राज्य शासनाने ज्या वस्तू लघु उद्योगासाठी व इतर संस्थांसाठी राखीव ठेवल्या आहेत त्या मागचा हेतू राज्यातील बेरोजगारांना उद्योग मिळावा, राज्यातील उद्योग व्यवसायात वाढ व्हावी असा आहे. मात्र शिक्षण मंडळाने फक्त निविदेमध्ये पुरवठादार हा उत्पादक असावा असे नमूद केले. मात्र प्राप्त झालेल्या निविदा त्या प्रमाणे आहेत अगर कसे याबाबत खात्री केलेली नाही. ही उदासिनता दाखविल्यामुळे परराज्यातील कंपनीकडूनही खरेदीबाबत निर्णय घेतला गेला ही बाब शासकीय धोरणाशी विसंगत आहे.

१५) **गणवेषाचे बाबतीत अंतिम उत्पादन म्हणजे प्रत्यक्ष शिक्षण मंडळाच्या स्पेसिफिकेशन प्रमाणे तयार करण्यात आलेला गणवेष प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे आवश्यक होते. कारण गणवेषामध्ये कापडाबरोबरच गणवेषाचे डिझाईन, त्याला कोठे किती खिसे असणार, शिलाई कोणत्या धाग्याने**

**करणार, प्रत्येक सेंटीमीटर अंतरावर किती टाके असणार, टिप्स किती असणार, त्याला बटणे किंवा झीप कोणत्या कंपनीची असणार, कॉलर कोणती वापरणार हेही तितकेच महत्वाचे आहे. आणि त्याची तपासणीही आवश्यक आहे असे असतांनाही फक्त कापड प्रयोगशाळेत पाठविण्यात आल्याचे दिसून येते. ज्या कपंनीला गणवेषाचे कंत्राट देण्यात आले त्या कंपनीच्या कापडाचाही नमुना नापास झाला आहे. आणि इतर बाबींची तपासणी झालीच नाही असे का?**

ज्या कंपनीकडून गणवेषाची खरेदी करण्यात येणार होती त्या कपंनीचे फक्त कापड प्रयोगशाळेत तपासण्याकरीता पाठविण्यात आले. गणवेषाची शिलाई त्याला लागणारी बटणे, झीप, इ. बाबत कोणतीही तपासणी झालेली नाही. किंवा खात्याने तसे पुरवठादारांना त्याबाबत सूचना दिल्याचेही आढळून येत नाही. त्यामुळे या तक्रारीत तथ्य असल्याचे दिसून येते.

१६) **कोणती वस्तू कोणत्या प्रयोगशाळेत पाठवावयाच्या याचा निर्णय कोणी व कशाच्या आधारे घेतला?**

सदरचा निर्णय सभापती, शिक्षण मंडळ आणि शिक्षण प्रमुख यांनी घेतला आहे. कोणती वस्तू कोणत्या प्रयोगशाळेत पाठवावयाच्या हे शासनाच्या दि. २ जानेवारी १९९२ च्या निर्णयात स्पष्ट केलेले आहे. मात्र रबर व पी.व्ही.सी. बूट तपासणी संदर्भात रेल इंडिया टेक्निकल ॲण्ड इकॉनॉमिक्स सर्व्हिसेस या संस्थेकडून उपरोक्त वस्तू तपासणी करण्याचे शासन निर्णयात नमूद नसतांना त्यांचेकडे तपासणीसाठी उपरोक्त वस्तू पाठविण्यात आल्या, हे योग्य नाही.

१७) **प्रयोगशाळेकडे पाठवावयाच्या वस्तूंना संकेतांक कोणी दिले?**

प्रयोगशाळेकडे पाठवावयाच्या वस्तूंना सभापती, शिक्षण मंडळ व शिक्षण प्रमुख यांनी संकेतांक दिलेले आहेत. मात्र हे अधिकार त्यांना देण्याबाबत कोणत्या बैठकीत निर्णय झाला याचा खुलासा केलेला नसल्यामुळे त्याबाबत मत व्यक्त करता येत नाही.

१८) **वह्यांच्या बाबतीत जाहीरातीत फक्त सुदर्शन कंपनीच्याच वह्या मागविण्यात आल्यानंतर शुद्धीपत्रकात आणखी काही कंपन्यांचा समावेश करण्यात आला हा निर्णय कोणी व कशाच्या आधारे घेण्यात आला. वह्यांसाठी फक्त एच.पी.सी. या एकाच कंपनीच्या कागदाचा आग्रह का धरण्यात आला? वह्यांची निविदा मागवितांना भारतीय मानक संस्थेने दिलेल्या चिन्हाचा विचार केला का?**

वह्यांसाठी प्रथम सुदर्शन कंपनीच्याच वह्या मागविण्याचे प्रसिद्ध करण्यात येवून नंतर काही अन्य कंपन्यांची नांवे समाविष्ट करण्याचे शुद्धीपत्रक काढले गेले. सदरचा निर्णय हा सभापती, शिक्षण मंडळ व शिक्षण प्रमुख यांनी मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील कलम ५६ नुसार घेतलेला आहे. याबाबत शिक्षण प्रमुख यांनी केलेला खुलासा स्विकारण्यास हरकत नसावी. मा. सर्वसाधारण सभेने ठराव संमत करतांना नामवंत कंपन्यांकडून खरेदी करावी असे ठरावात सूचित केलेले आहे. मात्र त्यात विशिष्ट कंपन्यांची नांवे दिलेली नाहीत. त्यामुळे सुदर्शन कंपनी व्यतिरिक्त अन्य कंपन्यांचीही नांवे दुरूस्त जाहिरातीद्वारे प्रसिद्ध करण्यात आली. पहिल्या जाहीरातीतच जास्तीत जास्त नामवंत कंपन्यांच्या नावाचा उल्लेख केला असता तर आणखी निविदा प्राप्त झाल्या असत्या, त्याकरीता पुरेसा अवधीही मिळाला असता त्यामुळे नंतर अन्य कंपन्यांच्या नावांसाठी शुद्धीपत्रक

काढण्यासंदर्भात तसेच बाजारामध्ये अनेक शासकीय कागद कंपन्या असतांना एच.पी.सी. या कंपनीच्या कागदाचाच आग्रह धरणेबाबत शिक्षण प्रमुख यांनी केलेला खुलासा समाधानकारक वाटत नाही.

१९) **वह्यांबाबत निविदा संचामध्ये कोणा एकाच कंपनीच्या दरपत्रकाचा उल्लेख आहे असे का?**
वह्या बाबतच्या निविदा संचामध्ये एका कंपनीने म्हणजे सुदर्शन कंपनीने एका पेक्षा अधिक निविदाधारकांना अधिकारपत्र दिलेले असल्याने बहुतांशी त्याच कंपनीच्या दरपत्रकाचा उल्लेख आहे. शिक्षण मंडळाने अन्य कंपन्यांची नावे नंतरच्या जाहीरातीत समावेश केल्याने सदर कंपन्यांच्या किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या वितरकांच्या निविदा प्राप्त होण्यास पुरेसा अवधी उपलब्ध न झाल्याने उपरोक्त परिस्थिती निर्माण झाली असावी असे आमचे मत आहे.

२०) **पाट्यांच्या बाबतीत फक्त के.डी. राजपूत कंपनीच्याच पाट्या मागविण्यात आल्या आहेत. बाजारात इतर कंपन्यांच्या पाट्या नाहीत काय, एकाच कंपनीच्या पाट्या मागवावयाच्या तर निविदेची गरज काय होती?**
या आरोपात तथ्य असल्याचे आढळते. वह्या खरेदीची जाहीरात देताना प्रथम फक्त एकाच कंपनीचे नाव नमूद करून व नंतर ही बाब टेंडर प्रक्रियेशी विसंगत असल्याचे कारण देवून अन्य कंपन्यांच्याही वह्या पुरवठयाबाबत दुरूस्त जाहीरात देणे आणि पाटी खरेदीमध्ये मात्र एकाच कंपनीच्या पाटीचा आग्रह धरणे ह्या दोन्ही बाबींतील निर्णयात विसंगती दिसून येते. त्याच प्रमाणे शासन निर्णयात आरक्षित असलेले शालेय साहित्य सदर निर्णयानुसार खरेदी न करता अन्य ठिकाणाहून खरेदी करणे ही बाबही चुकीची वाटते.

२१) **अनेक पुरवठादारांनी एकाच उत्पादकाचे आपण अधिकृत पुरवठादार असल्याचे पत्र सादर केले. व कंपनी आपल्याच उत्पादनाला जबाबदार असल्याचे नमूद केले आहे. शिक्षण मंडळाने या पत्रांची खातरजमा कशी करून घेतली?**
उत्पादक कंपनीने म्हणजे सुदर्शन या कंपनीने निविदेतील अनेक पुरवठादारांना स्वतंत्र पत्र दिलेले आहे. शिक्षण प्रमुख यांनी संबंधित कंपनीच्या व्यवस्थापकांशी दूरध्वनीवरून खात्री करून घेतल्याचे नमूद केलेले आहे हा खुलासा समाधानकारक नाही.

२२) **शिक्षण मंडळाच्या स्पेसिफिकेशनप्रमाणे एकाच कंपनीने वेगवेगळया पुरवठादारांमार्फत नमुने सादर केले. त्यातील काही नमुने प्रयोगशाळेत अपात्र ठरले याचा अर्थ (१) कंपन्यांनी वेगवेगळया पुरवठादारामार्फत वेगवेगळे नमुने सादर केले (२) पुरवठादारांनी संबंधित कंपनीचा नसलेला माल व कंपनीचे खोटे प्राधिकारपत्र सादर केले किंवा (३) प्रयोगशाळेच्या तपासणी प्रक्रियेमध्ये काहीतरी घोटाळा आहे अशी यातील खरे काय?**
शिक्षण प्रमुखांनी या संदर्भात केलेल्या खुलाशामध्ये प्रयोगशाळांच्या अहवालाबद्दल शंका व्यक्त केली आहे. तथापी एकाच कंपनीचा माल वेगवेगळया पुरवठादारांनी वेगवेगळे नमुने देवून सादर केला किंवा संबंधित कंपनीचा नसलेला माल व कंपनीचे खोटे प्राधिकारपत्र सादर केले किंवा कसे

याबाबत कोणतीही खात्री केल्याचे दिसून येत नाही व त्याबाबत शिक्षण प्रमुख यांनी काहीही नमूद केलेले नाही जे योग्य नाही.

२३) **बुटांच्या खरेदीबाबत लिबर्टी व बाटा या दोनच कंपन्याचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले. खरेतर नियमानुसार ३ निविदाकार नसल्याने नमुने प्रयोगशाळेत न पाठविता फेर निविदा मागविणे आवश्यक होते तसे न करता उलट नमुना नापास झाल्यानंतरही बाटा व लिबर्टी शूज कंपनीच्या निविदा का उघडण्यात आली?**

यासंदर्भात शिक्षण प्रमुख यांनी त्यांचे खुलाशामध्ये लिबर्टी कंपनीचे १ आणि बाटा कंपनीचे २ निविदाधारक असे ३ निविदाधारक असल्याचे नमूद केले आहे. मात्र प्रयोगशाळेकडून नमुना नापास झाल्यानंतरही उपरोक्त दोन्ही कंपन्यांच्या निविदा का उघडल्या याचा खुलासा केलेला नाही. वास्तविक प्रयोगशाळेने प्रतिकूल अहवाल दिलेला असतांना निविदा अटी व शर्तीनुसार सदर कंपन्यांच्या निविदा उघडण्याऐवजी फेर निविदा मागविणे आवश्यक होते.

२४) **पद्मयोग व गिरी फॅब या कंपन्यांनी तांत्रिक निविदा उघडल्यानंतर म्हणजे १३ जून २००८ नंतर अधिकारपत्र सादर केल्याचे दिसून येते.**

या तक्रारीसंदर्भात शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या खुलाशामध्ये उपरोक्त कंपन्यांच्या प्राधिकारपत्रातील दिनांक व पत्त्यामध्ये खाडाखोड दिसून आल्याने त्यांना स्वच्छ प्रतीमध्ये प्राधिकारपत्र सादर करण्याबाबत कळविले यामागे स्पर्धा व्हावी असा उद्देश असल्याचे नमूद केले आहे. तथापी निविदा शर्ती अटींचे अवलोकन करता ही बाब उचित नाही.

२५) **चुकीच्या पद्धतीने तरीही फक्त बाटा आणि लिबर्टीमध्ये निविदा स्पर्धा झाली हे कितपत योग्य आहे असा प्रश्न आहे.**

याबाबत मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम ५६ (ड) नुसार उपरोक्त कंपनीच्या ३ निविदाधारकांचे दरपत्रक उघडण्यात आल्याने योग्य स्पर्धा झाली असल्याचे शिक्षण प्रमुख यांनी खुलाशात नमूद केले आहे. मा. मुख्य सभेचा ठराव हा नामवंत कंपन्यांचे उत्पादने खरेदी करण्यासंदर्भातील आहे. व वरील दोन्ही कंपन्या या नामवंत कंपन्या आहेत. निविदा मागवितांना उपरोक्त कंपन्यांव्यतिरिक्त अन्य नामवंत कंपन्यांकडूनही निविदा मागविल्या असत्या तर ही परिस्थिती उद्भवली नसती.

२६) **या सर्व निविदा प्रक्रिया संदर्भात शिक्षण मंडख सदस्यांनी व अधिकाऱ्यांनी कोणकोणत्या कंपन्यांना भेट दिली आणि या भेटीचा खर्च कोणी केला याचीही चौकशी व्हावी. तसेच संबंधित अधिकारी, सदस्य यांनी अहवाल सादर केला होता काय? केला असल्यास त्याची प्रत जोडावी.**

अध्यक्ष शिक्षण मंडळ व शिक्षण प्रमुख यांनी रीड ॲण्ड टेलर्स यांचे निमंत्रणावरून व कंपनीच्याच खर्चाने भेट दिली असल्याचे दिसून येते. मात्र हे दोघेही प्राधिकारी व अधिकारी चौकशी अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे तज्ञ नाहीत. त्यामुळे त्यांनी गणवेषाच्या कापडाच्या नमुन्याकरीता म्हैसूर येथे

भेट देण्याची आवश्यकता नव्हती आणि तरीही ही भेट जर शिक्षण मंडळाच्याच कामकाजासाठी झालेली आहे तर त्याचा अहवाल त्यांनी देणे आवश्यक वाटते.

२७) **तुषार ड्रेसेस, महालक्ष्मी ड्रेसेस व प्रेस्टिज गारमेन्ट्स या तिन्ही कंपन्या एकाच मालकाच्या असल्याचे पिंपरी चिंचवड मनपाच्या लेखा परिक्षण अहवालात (२००८) नमूद केलेले आहे. त्यावेळेस श्री. तांबे हेच अधिकारी असतांना घडलेले आहे. सबब प्रसतुत बाब शिक्षण मंडळाच्या निदर्शनास आणली का?**

त्याबाबत शिक्षण प्रमुख यांनी केलेला खुलासा पाहता त्यांनी ही बाब शिक्षण मंडळाचे निदर्शनास आणली नसल्याचे दिसून येते.

२८) **मंजूर झालेल्यांची बँक सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट सादर करावे.**

निविदादारांचे बँक सॉल्व्हन्सी संदर्भात आलेल्या तक्रारीबाबत चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला अहवाल पाहता पाटी खरेदीची मान्य केलेल्या निविदाधारकाचे सॉल्व्हन्सी सर्टिफिकेटची मुदत ही टेंडर प्रक्रिया चालू असतांनाच संपुष्टात आलेली आहे. ही बाब घाईगर्दीत लक्षात आली नसल्याचा शिक्षण प्रमुख यांचा खुलासा समाधानकारक नाही. त्यामुळे जरी आर्थिक नुकसान झालेले नसले तरी निविदा प्रक्रियेशी ही बाब विसंगत ठरते.

२९) **मंजूर झालेल्यांची एस.एस.आय.सादर करावे/पडताळणी केली का?**

मंजूर झालेल्या निविदाधारकांपैकी लिबर्टी शूज व तुषार ड्रेसेस ॲण्ड टेलरिंग फर्म यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणाचेही एस.एस.आय. सर्टिफिकेट तपासण्यात आले नसल्याचे चौकशी अधिकारी यांनी नमूद केले आहे. मात्र निविदा पाकीट क्र. १ मध्ये पात्र ठरलेल्या सर्व पुरवठादारांची एस.एस.आय. प्रमाणपत्र तपासण्यात आले असल्याचा खुलासा शिक्षण प्रमुख यांनी केला आहे. तथापी या तपासणी पुष्ठ्यर्थ कोणतीही कागदपत्रे प्रकरणात आढळून येत नाहीत.

३०) **लिबर्टी एस.एस.आय. आहे काय? त्यांना अनामत रकमेत सूट देण्यात आली आहे का किंवा कसे?**

शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या त्यांच्या खुलाशात सर्व कंपन्यांचे एस.एस.आय. सर्टिफिकेट तपासल्याचे नमूद केलेले आहे. मात्र नंतरच्या खुलाशात लिबर्टी शूज कंपनी लि. ही स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अंतर्गत येत नसल्याचे व तसे समजण्यात चूक झाल्याचे कबूल केले आहे. तसेच लिबर्टी प्रा.लि.ही कंपनी एस.एस.आय. नसतांना त्यांना अनामत रकमेत सूट दिली ही खात्याची चूक आहे.

३१) **वर्कऑर्डरमध्ये ब्रँडनेचा उल्लेख नाही. स्पेसिफिकेशन व करारनाम्यात उल्लेख केलेला आहे का?**

वर्कऑर्डरमध्ये कंपनीच्या नावाचा उल्लेख नाही. करारनाम्यामध्ये स्पेसिफिकेशनप्रमाणे माल पुरवावा फक्त असे नमूद केलेले आहे. मात्र त्याचा तपशिल दिलेला नाही.

३२) **पिंपरी चिंचवडचा लेखा अहवाल रेकॉर्डवर घेण्यात यावा.**

याबाबत शिक्षणप्रमुख यांनी संमती दर्शविली आहे.

३३) **पाकीट क्र. १ उघडल्यानंतर सॅम्पल टेस्टींगमध्ये (सुपरिंटेंडेंट कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि., मुंबई) नापास झाल्यानंतर त्यांचे पाकीट ब का उघडण्यात आले आहे.**

या प्रयोगशाळेतून नापास झालेल्या ठेकेदारांचेही " ब" पाकीट उघडण्यात आलेले आहे व सदरची कार्यवाही शिक्षण मंडळाच्या सभेत घेतल्याचे शिक्षण प्रमुख यांनी नमूद केले आहे. मात्र ही घटना निविदा प्रक्रियेशी विसंगत आहे. याबाबत शिक्षण प्रमुख यांचा खुलासा समाधानकारक नाही.

३४) **टेंडर निघतांना नंबर्स दिले होते काय? व त्याच नंबरचे परत प्राप्त झाले काय?**

याबाबत शिक्षण प्रमुख यांनी निविदा वितरीत करीत असतांना निविदादारांना क्रमांक देण्यात येतात व त्यानुसार स्विकारले जातात असे उत्तर दिले असून ते मोघम आहे. या टेंडर प्रक्रियेमध्ये टेंडरदारांना दिलेले नंबर्स बाबत स्पष्ट खुलासा केलेला नाही. तसेच चौकशी अधिकारी यांनीही त्याबाबत काहीही निष्कर्ष काढलेला नाही.

३५) **पाकीट ब च्या शिक्क्यांचा रंग का बदललेला आहे?**

याबाबत शिक्षण प्रमुखांनी केलेल्या खुलाशात टेंडर फॉर्म विक्रीचे वेळी कार्यालयात उपलब्ध असलेल्या काळया-निळया त्या-त्या रंगाच्या इंकपॅडचा वापर झाल्यामुळे असे घडले असल्याचे नमूद केले आहे. जर ब पाकीट उघडतांना सर्व पात्र निविदादारांना बोलाविले असते तर या शंकेला जागा उरली नसती.

३६) **पाकीट ब फोडतांना आम्हांस बोलाविण्यात आलेले नाही, पाकीट चेंज करण्याचा संशय असल्याने खात्याने याबाबत अभिप्राय द्यावा.**

पाकीट ब उघडतांना निविदादारांना न बोलाविल्याबद्दल सदरचा निर्णय मुं.प्रा.शि.नि.१९४९ मधील ५६ (ड) नुसार शिक्षण मंडळाने घेतला असल्याचा व त्यात कोणताही गैरहेतू नसल्याचा खुलासा केला आहे. मात्र ही कार्यवाही निविदा प्रक्रियेला धरून नाही.

३७) **राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती ग्राहक संघ यांची निविदा अपूर्ण ठरविण्याचे कारण काय?**

शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या खुलाशात सदर पुरवठादाराने सादर केलेल्या शॉप ॲक्ट लायसेन्समध्ये धंद्याच्या स्वरूपाचा उल्लेख नाही. डिमांड ड्राफ्ट बँकेत पास झाला नाही आणि अधिकृत पुरवठादार म्हणून विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचेकडे नोंदणी केली नसल्यामुळे ते पात्र ठरू शकलेले नाहीत. असा खुलासा केलेला आहे.

३८) **फॉरमॅटमध्ये ऑथॉराईज लेटर नसतांना इतरांप्रमाणे श्री. माहेश्वरी यांना पुन्हा सादर करण्याबाबत संधी का दिली नाही?**

याबाबत शिक्षण प्रमुख यांनी केलेला खुलासा व त्यावर चौकशी अधिकारी यांनी दिलेले मत पाहता या पूर्वी अन्य प्रकरणी निविदा उघडल्यानंतर ठेकेदाराला त्यांच्या कागदपत्रामध्ये सुधारणा करण्याची

संधी दिल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्येक ठेकेदाराच्या बाबतीत शिक्षण मंडळाने वेगळे धोरण स्विकारले या निष्कर्षाशी आम्ही सहमत आहोत.

३९) **पात्र निविदाधारकांचे ब पाकीट सर्वांसमक्ष सील करून कस्टडीत ठेवणे अपेक्षित आहे आणि तसे का करण्यात आले नाही? लिफाफे बदलण्याची शक्यता आहे काय?**
सर्व लखोटे एका पेटीमध्ये ठेवून पेटी सील केल्याचे शिक्षण प्रमुख यांनी लेखी खुलाशात नमूद केले आहे. मात्र चौकशीचे वेळी निविदा पाकीटे सील करून ठेवले नसल्याचे सांगितले. यावरून श्री. तांबे यांनी लेखी दिलेली माहिती आणि तोंडी केलेला खुलासा यात विसंगती दिसून येते.

४०) **१९९२ चा जी आर सोयीस्कररित्या घेतलेला आढळतो याबाबतचा खुलासा द्यावा.**
याबाबत शिक्षण प्रमुख यांनी शिक्षण मंडळाचे सर्व कामकाज मुं.प्रा.शि.नि.१९४९ नुसार चालते. या नियमामध्ये वित्तिय नियमांचा उल्लेख नाही अशा आवश्यक वेळी २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाचा आधार घेण्यात येतो असा खुलासा केलेला असून सदर नियमाचा कामकाज करतांना आधार घेताना त्यात काही गैर नाही.

४१) **१८० पानी ४ रेघी बाऊंड वही सुदर्शन जम्बो डिलक्स वह्यांकरीता गणेश ट्रेडर्स पुणे यांचे वेगवेगळे दर का मान्य केले गेले. जावक क्र. भांडार/१४२८ दि.९/७/२००८ व कार्यपत्रिका क्र.३ विषय क्र.३८ ठराव क्र.३८ दि. २३/६/२००८ याचा खुलासा करावा.**
शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या खुलाशामध्ये एकाच प्रकारच्या वह्यांसाठी नियमित शाळांसाठी एक दर व विद्यानिकेतन करीता दुसरा दर गणेश ट्रेडर्स यांनी सादर केल्याचे मान्य केले आहे. याबाबत त्यांनी याचा खुलासा ठेकेदाराकडून घ्यावा असे अप्रत्यक्षपणे नमूद केले आहे. हा खुलासा समाधानकारक नाही. एकाच संस्थेकरीता माल खरेदी करताना एकाच प्रकारच्या मालासाठी वेगळा दर येवूनही त्याबाबत शंका उपस्थित न करणे हे निविदा प्रक्रियेशी सुसंगत नाही.

४२) **सद्या वाटप झालेल्या वस्तूंच्या दराबाबत चालू बाजारभावाशी क्रॉस चेकींग करणे व जर डिफरन्स आढळला तर कोणाकडून वसूली करावी?**
शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या खुलाशात या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. उलट व्हॅट, वाहतूक वगैरे बाबी समाविष्ट करून दर मागविण्यात आल्याने ते दर एम.आर.पी. पेक्षा जास्त असल्याचे म्हटले आहे हे विधान अव्यावहारिकतेचे लक्षण आहे. वास्तविक एम आर पी पेक्षा जास्त किंमत आकारताच येत नाही.

४३) **सुदर्शन कंपनीच्या दरपत्रकात श्री.राजेश नहार व श्री. विजय कुंभार यांनी सादर केलेल्या दरपत्रकांचा रू.११.५० व १२ रूपये असताना मंडळाने रू.१९.९३ च्या वह्या खरेदी करण्यामागील कारण काय?**

शिक्षण प्रमुख यांनी याबाबत केलेल्या खुलाशात कमी दराच्या वह्या निकृष्ठ दर्जाच्या असल्याने खरेदी केल्याचे म्हटले आहे. मात्र उपरोक्त किंमतीच्या वह्यांच्या विविध दर्जाबाबत स्पष्ट खुलासा केलेला नाही.

४४) **श्री. वेलणकर यांनी ग्राहक पेठेच्या वतीने १८ रू. पाटीची किंमत असल्याचे नमूद केल आहे सबब जादा दराने पाट्या खरेदीबाबत मंडळाचा उद्देश काय?**
शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या खुलाशात के.डी.राजदूत कंपनीच्या स्लेट पाट्यांची खरेदी करताना आयकर, व्हॅट, इ. सह खरेदी केलेली आहे. सदरची खरेदी जादा दराने खरेदी केली नसल्याचे म्हटले आहे. चौकशी अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे सदर पाट्यांचे बाजारातील किंमती पाहता मोठया खरेदीमध्ये एमआरपी पेक्षा किमान २०% दर कमी येणे आवश्यक आहे असे आमचे मत आहे.

४५) **सुदर्शन कंपनीचे ऑथराईज्ड लेटरच्या तारखा ह्या निविदा पूर्वीच्या आढळतात व सर्वांचे पत्रावर ह्या ठेकेदारांशिवाय कोणासाठी ऑथोरायझेशन दिले नाही असे नमूद केले आहे. त्यामुळे सर्वांत शेवटी सुदर्शनने दिलेले संस्थेस पात्रता लागते व इतर सर्व डिसक्वालीफाय होतात असे तक्रारदारांचे म्हणणे आहे याबाबत अभिप्राय नोंदवावा.**
या तक्रारीमध्ये तथ्य आहे. तपासणी मध्ये ४/२/२००८, २४/२/२००८, ५/४/२००८ आणि १८ मे २००८ या तारखांची शिक्षण प्रमुखांच्या नांवे असलेली ऑथरायझेशन लेटर प्रकरणी आढळून येतात. निविदा प्रसिद्धी दि. ३० मे २००८ असल्याचे शिक्षण प्रमुख यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे. हे पाहता उपरोक्त आरोपास पुष्टी मिळते.

४६) **वह्यांच्या निविदेप्रमाणे इतर वस्तूंच्या निविदेकरीता ऑथरायझेशन लेटरचा फॉरमॅट सेम आहे काय?**
याबाबत शिक्षण प्रमुख यांनी होय असे उत्तर दिले आहे. निविदा कार्यवाहीमध्ये विविध वस्तूंसाठी विविध कंपन्यांनी पुरवठादारांनी भाग घेतलेला आहे. असे असतांना सर्वांच्या ऑथरायझेशन लेटरमध्ये साम्य असणे याचा अर्थ ही सर्व ऑथरायझेशन लेटर ठरवून दिली गेली असा होवू शकतो.

४७) **एच पी सी चा ऑथोराईज्ड डिलर असतांना श्री. राजेश पेपर प्रॉडक्टस यांची निविदा अपात्र का ठरविण्यात आली? –**
शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या खुलाशात एच पी सी कंपनी कागद पुरविते मात्र शिक्षण मंडळाची निविदा वह्या पुरविण्याची होती. श्री. नहार यांच्या वह्या निविदा नोटीसमध्ये नमूद ब्रँडमध्ये समाविष्ट नव्हती. त्यामुळे पाकीट क्र. १ उघडल्यानंतर शिक्षण मंडळाने अपात्र ठरविले आहे असे नमूद केले आहे. वास्तविक वह्यांच्या कागदांचा निकष ठरवितांना तो एच पी सी कंपनीचा असावा असे ठरविल्याचे शिक्षण प्रमुख यांनी यापूर्वी लेखी खुलाशात नमूद केले आहे. निविदा जाहीरातीमध्ये जरी विशिष्ट कंपन्यांच्या नावाचा उल्लेख केलेला असला तरी श्री. राजेश पेपर प्रॉडक्ट हे एच.पी.सी. च्या वह्यांचे ऑथरॉइज्ड डिलर होते व मा. मुख्य सभेने शिक्षण मंडळाच्या खरेदीसंदर्भात कोणत्याही विशिष्ट कंपनीच्या नावाचा उल्लेख न करता नामवंत कंपन्यांकडून खरेदी करण्याबाबत सुचित केले होते. जर निविदेमध्ये स्पर्धा व्हावी असे वेळोवेळी शिक्षण प्रमुख यांनी जे नमूद केले आहे तसे त्यांना

खरोखर अभिप्रेत असेल तर श्री. राजेश पेपर प्रॉडक्टस यांनी नमूद केलेल्या वह्यांचा कागद हा निविदा स्पेसिफिकेशननुसार एच पी सी कंपनीचा असल्याने त्यांचेही पाकीट क्र. २ उघडायला हरकत नव्हती.

४८) **निविदा काढल्यानंतर प्रतिभा, क्लासमेट, नवनीत यांचे नावाचे शुद्धीपत्रकात नोंद घेण्यामागील कारणे काय? तसेच शुद्धीपत्रकानंतर निविदा फॉर्ममध्ये बदल का करण्यात आले नाही?**
निविदेमध्ये स्पर्धा व्हावी या कारणास्तव शुद्धीपत्रक काढून आणखी काही कंपन्यांची नावे समाविष्ट केल्याचे शिक्षण प्रमुख यांनी यापूर्वीच त्यांच्या खुलाशात नमूद केले आहे. तसेच शुद्धीपत्रकानंतर ते निविदा फॉर्ममध्ये बदल करण्याचे अनावधानाने राहून गेल्याचे नमूद केले आहे. सदरचा खुलासा समाधानकार नाही.

४९) **ब पाकीट उघडल्यानंतर एल वनच्या दरात तुषारच्या दरात जील एंटरप्राईजेसला ऑफर का देण्यात आली नाही? जेणेकरून अपेक्षित गुणवत्तेचा माल न्युनतम दरात देणे शक्य झाले असते.**
या तक्रारीबाबत सदर कंपनीलाही न्यनतम दराने अंशत: काम देण्यात आले आहे असे शिक्षण प्रमुख यांनी खुलाशात नमूद केले आहे. सदर खुलाशावर चौकशी अधिकारी यांनी एकूण १४ आयटेमपैकी केवळ एक आयटेम जील एंटरप्राईजेस यांना देण्यात आला आहे असे नमूद केले आहे.

५०) **३०/५/२००८ ते ५/६/२००८ पर्यंत निविदा फॉर्म का देण्यात आले नाही.**
मात्र या काळामध्ये फॉर्म विक्रीसाठी उपलब्ध होते तथापी पुरवठादार घेण्यास आले नाहीत असा खुलासा शिक्षण प्रमुख यांनी केलेला आहे.

५१) **दि.५/६/२००८ ते ७/६/२००८ मध्ये फॉर्म विकणे चालू होते नंतर ११/६/२००८ पर्यंत मुदत वाढविलेली आढळते. सदरची निविदा दि. १३/६/२००८ रोजी उघडण्याचे प्रयोजन काय?**
या तक्रारीत तथ्य आढळून येत नाही.

५२) **निविदा मागणी मागविण्याकरीता ३ आठवडयांची मुदत दिली होती का?**
याबाबत शिक्षण प्रमुख यांनी १४ दिवसांची निविदा मागविली होती असा खुलासा केलेला आहे. वास्तविक मोठया रकमेची निविदा प्रक्रिया असल्याने त्याकरीता निविदादारांना पुरेसा वेळ देणे आवश्यक होते.

५३) **वह्या खरेदीबाबत स्क्रुटिनी शिट कोणी बनविले आहे?**
याबाबत सदरचा स्क्रुटीनी शीट भांडारपाल यांनी बनविले असल्याचा शिक्षण प्रमुख यांनी खुलासा केलेला आहे.

५४) **समर्थ को ऑप यांची निविदा रद्द करण्यामागील कारणे काय?**
शिक्षण प्रमुख यांनी त्यांच्या खुलाशामध्ये सदर कंपनीने बयाणा रक्कम भरलेली नाही, सॉल्व्हन्सी एकवट नाही, टेंडर अटीमध्ये पुरवठादाराचे नाव व पत्ता यामध्ये तफावत असल्याचे, तसेच संचालक

मंडळाची कोणतीही यादी अथवा टेंडर फॉर्मवर सह्या करणाऱ्या अधिकारासाठी डायरेक्टर बोर्डाचे अधिकारपत्र जोडले नसल्याचे नमूद केलेले आहे. सदरचा खुलासा समाधानकारक आहे.

५५) **स्क्रुटीनी शीट मध्ये समर्थ करीता टन ओव्हर व कामाचा अनुभव दाखला असताना स्क्रुटिनी शीटमध्ये नाही म्हणून लिहीले आहे. सबब त्यांनी एकच सॅम्पल टेस्टींगचे पैसे भरले असताना त्यांचे तीन पैकी एक सॅम्पल लॅब टेस्टींगला का पाठविण्यात आले नाही?**

याबाबत प्रकरणाची छाननी करता तक्रारीत तथ्य असल्याचे दिसून येते. परंतु असे असले तरी सदर पुरवठादाराने बयाणा रक्कम भरलेली नाही, तसेच अन्य बाबींची पुर्तता केलेली नसल्याने त्याच्या निविदेचा विचार करण्यात आलेला नाही.

५६) **राईट्स ही लोखंड व पोलाद टेस्टींग लॅब आहे. त्यांचेकडे रबर/पीव्हीसी बूट टेस्टींगला पाठविण्याचा निर्णय कोणाचा आहे?**

कोणती वस्तू कोणत्या प्रयोगशाळेत पाठवावयाच्या हे शासनाच्या दि. २ जानेवारी १९९२ च्या निर्णयात स्पष्ट केलेले आहे. मात्र रबर व पी.व्ही.सी. बूट तपासणी संदर्भात रेल इंडिया टेक्निकल ॲण्ड इकॉनॉमिक्स सर्व्हिसेस या संस्थेचे नांव उपरोक्त शासन निर्णयात नसतांनाही त्यांचेकडे उपरोक्त वस्तू पाठविण्यात आल्या. याबाबत घेण्यात आलेला निर्णय हा चुकीचा आहे.

५७) **गणवेष खरेदीबाबत बिडर हे शिलाई करण्यास सक्षम आहेत काय? याची खातरजमा केली आहे काय?**

या प्रश्नाला संबंधीत निविदारांच्या शिलाईचा पुर्वानुभव विचारात घेण्यात आला आहे असे शिक्षण प्रमुख यांनी त्यांच्या उत्तरात नमूद केले आहे.

५८) **ज्या कागदपत्रांमुळे सनराईजची निविदा रद्द झाली त्याच कारणामुळे पद्मयोग अपात्र होणे आवश्यक आहे परंतु तसे न करता त्यांना मान्यता दिल्याचे आढळते याबाबत खात्याने अभिप्राय द्यावा.**

प्रकरण पाहता पद्मयोग या निविदाकराने जाहीरातीत नमूद केलेल्या सुदर्शन कंपनीच्या वह्यांची निविदा भरली असल्याचे मात्र सनराज प्रिंट पॅकींग यांनी जाहिरातीत नमूद केलेल्या कंपनीच्या वह्यांची निविदा भरली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे या आरोपात तथ्य नाही.

५९) **दि.१८/६/२००८ सुपरिंटेंडेंट कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या लॅब कडे नमुने टेस्टसाठी पत्र पाठविण्यात आले. दि. ३०/६/२००८ सुपरींटेंडेंट कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. यांनी काम करण्यास असमर्थता असल्याचे पत्र सादर केलेले आहे. तत्पुर्वी या कार्यालयाने दुसऱ्या लॅबकडे नमुने टेस्टींग करीता का पाठविले नाही?**

याबाबत शिक्षण प्रमुख यांनी दि.२१/६/२००८ चे पत्राने खादी ग्रामोद्योग महामंडळ, पुणे यांचेकडून नमुना तपासून घेतले असल्याचे खुलासा केलेला आहे.

**६०) कल्याणी कार्पोरेशन ह्यांचे शॉप ॲक्टमध्ये फरक असताना त्यांना इतरांप्रमाणे अपात्र का ठरविण्यात आले नाही?**

शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या खुलाशात कल्याणी कार्पोरेशन यांचेकडील शॉप ॲक्टच्या लायसेन्समध्ये प्रिंटींग व लॅमिनेशन, डी.टी.पी. बाईंडिंग असे धंद्याच्या कामाचे स्वरूप नमूद केलेले आहे. कल्याणी कार्पोरेशन यांची निविदा ही वह्या पुरविण्याकरीता असल्याने त्यांचेकडे स्टेशनरी व्यवसायाचे शॉप ॲक्टचे लायसेन्स असणे आवश्यक होते. ते नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांना अपात्र ठरविणे आवश्यक होते. सबब तक्रारीमध्ये तथ्य आहे.

**६१) हातमाग लॅबकडून १८४८-१९९१ जे.एस.प्रमाणे लॅब टेस्टींग न होता फक्त पेपरच्या क्वॉलिटी बाबत टेस्ट का केली गेली. सबब त्यांचा रिपोर्ट मान्य करण्यासारखा नसतांना त्या अनुषंगाने निविदा मान्य करण्यामागे कारण काय?**

शिक्षण मंडळाने केवळ ५४ जी.एस.एम.पेपरची तपासणी करून घेणे अपेक्षित केले होते असा खुलासा शिक्षण प्रमुख यांनी केला आहे. निविदेचे स्वरूप पाहता संपूर्ण वहीची तपासणी करून घेणे अपेक्षित असल्याच्या चौकशी अधिकाऱ्यांच्या निष्कर्षाशी आम्ही सहमत आहोत.

**६२) सनराज करीता स्वतंत्र मालक असतांना पार्टनरशीप नुसार शॉपॲक्ट असण्याचे का नमूद केले गेले व त्यानुसार त्यांना अपात्र ठरविण्यात आल्याचे स्क्रुटिनी सिट मध्ये कोणी नमूद केले व का?**

याबाबत सनराज यांना शॉप ॲक्ट ऐवजी ब्रँडमध्ये अपात्र ठरविले असल्याचा शिक्षण प्रमुख यांनी खुलासा केलेला आहे. व तसे स्क्रुटिनी शिटमध्ये नमूद केलेले आहे.

**६३) जा.क्र.भांडार/२०१६/२००५-०६ दि.२/८/२००८ नुसार समर्थ को आपरेटिव्ह कन्झूमर्स सेंट्रल स्टोअर्स प्रा.लि., मुंबई यांची निविदा रद्द करण्यामागील कारणे संयुक्तिक नाहीत. १) शॉप ॲक्ट मधील तफावत आढळते २) बँक सॉल्व्हन्सी २५ लाख नमूद केली, ३) सॅम्पल टेस्टींग फी पुरेशी नाही अपूरी आहे. पूर्णत: चुकीची आढळते खुलासा करावा.**

समर्थ को आपरेटिव्ह कन्झूमर्स सेंट्रल स्टोअर्स प्रा.लि., मुंबई यांना अपात्र ठरविल्याबाबत (त्यांनी बयाणा रक्कम भरलेली नाही, अर्धवट बँक सॉल्व्हन्सी, इ. कारणे असल्याचा) शिक्षण प्रमुख यांनी केलेला खुलासा पुरेसा आहे.

**६४) स्क्रुटिनी शिट मॅन्युअली बनविणाऱ्यांचे नांव काय? टाईपकेलेल्या व हाताने लिहीलेल्या तक्त्यामध्ये माहितीची तफावत आढळते खुलासा करावा. श्री. कुंभार यांनी दिलेल्या तक्त्यात ३५ व १५ लाखांचा प्रॉब्लेम लिहीलेले आहे. तथापी हाताने लिहीलेल्या तक्त्यात २५ लाख नमूद केले आहे. याबाबत खुलासा व्हावा.**

सॉल्व्हन्सी रक्कम रू. ३५ व १५ लाखाबद्दल झालेल्या चुकी संदर्भात सदरची चूक शिक्षण प्रमुख यांनी मान्य केलेली असून टायपिंग केलेल्या स्क्रुटिनी शिटमध्ये योग्य ती दुरूस्ती केलेली आहे. त्यामुळे या तक्रारीत तथ्य नाही.

६५) **निविदा प्रकरणातील प्रत्येक सहीबरोबर दिनांक का टाकलेले नाहीत खुलासा करावा.**
याबाबतच्या आरोपासंदर्भात शिक्षण प्रमुख यांनी सदरची बाब चुकून झाली असल्याचे नमूद केले आहे. मात्र याबाबत प्रशासनाचा दीर्घ अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून अशी चूक अपेक्षित नाही व त्या पाठीमागे दिशाभूल करण्याच्या निष्कर्षाबाबत आम्ही सहमत आहोत.

६६) **बूट खरेदी निविदामध्ये सॅम्पल टेस्टींग फी पेज नं.१ वर ३०००/- नमूद केली आहे व पुढे रू.४०००/- पर सॅम्पल नमूद केले आहे दोन्हीमध्ये तफावत का? तीन सॅम्पल टेस्टींग फी करीता १२००० रूपये घेणे आवश्यक आहे का खुलासा व्हावा.**
**या** तक्रारीबाबत सदर चूक ही टायपिंग चूक असल्याचे सदरची फी रू.४०००/- प्रमाणे असल्याचे व प्रत्यक्ष त्याप्रमाणेच रक्कम स्विकारली असल्याचे तसेच त्यामुळे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नसल्याचा खुलासा शिक्षण प्रमुख यांनी केला आहे.

६७) **समर्थ को-ऑप कन्झूमर्स सेंट्रल स्टोअर्स प्रा.लि. यांची निविदा अपूरी सॅम्पल टेस्टींग फी असलेल्या कारणामुळे अपात्र ठरविलेली आहे का? इतरांप्रमाणे त्यांना दुरूस्तीची संधी का दिली नाही.**
या प्रश्नासंदर्भात शिक्षण प्रमुख यांनी सदर संस्थेने बयाणा रक्कम भरलेली नाही व इतर अन्य कारणे असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे या तक्रारीवर विचार करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

६८) **बूट खरेदी पद्योग यांचे शॉप ॲक्टमध्ये सटेशनरी हार्डवेअर असताना त्यांना पात्र का ठरविण्यात आले त्याचा खुलासा व्हावा. तथापी समर्थ यांचे शॉप ॲक्ट असताना त्यांना अपात्र ठरविले याचा खुलासा व्हावा.**
पद्योग यांच्या शॉप ॲक्टमध्ये फूटवेअर असा उल्लेख असल्याचे शिक्षण प्रमुख यांनी नमूद केले आहे. याबाबत चौकशी अधिकारी यांनी प्रत्यक्ष चौकशीच्या वेळी तसा उल्लेख नसल्याचे म्हटलेले आहे. पद्मयोग यांच्या शॉप ॲक्ट लायसेन्सची उपलब्ध छायांकित प्रत पाहता धंद्याचे स्वरूप या सदरामध्ये फूटवेअरचा उल्लेख दिसून येत नाही. चौकशी अधिकारी यांनी पृष्ठ क्र.३११ वर शॉप ॲक्ट लायसनमध्ये नंतर फूटवेअर असा अंतर्भाव केल्याचे नमूद केले आहे. ती प्रकरणी आढळून येत नाही. तथापी अंतिम मान्यतेमध्ये लिबर्टी शूज कंपनी लि. हरियाणा यांची निविदा मान्य झाल्याचे दिसून येते. त्यामुळे या तक्रारीवर विचार करण्याची आवश्यकता नाही.

६९) **पिंपरी चिंचवड शिक्षण मंडळाने त्यांचे आदेश क्र.शिक्षण/लेखा/१/कावि/२६८/०८ नुसार दिलेल्या वर्कऑर्डरप्रमाणे मुलांसाठीचे शूज १ अधिक २ जोडमोजे च्या किंती रू.१६९/- दिलेले आहे. परंतु पुणे शिक्षण मंडळाने शूजसाठी रूपये १९३/- व मोजे प्रत्येकी १८.५० असे एकूण २३० रूपये इतका दर दिला आहे. एकंदरीत खरेदी करावयाच्या संख्येचा विचार करता रू. १ कोटी ३५ लाख २० हजार पिंपरी चिंचवड, रू. १ कोटी ८४ लाख पुणे असा अंदाजे ४९ लाखाचा फरक आढळतो. तसेच साईजप्रमाणे सखोल परिक्षण केले असता कमी जास्त होवू शकेल यावर खात्याने अभिप्राय द्यावा.**

याबाबत शिक्षण प्रमुख यांनी केलेल्या खुलाशात पिंपरी चिंचवड शिक्षण मंडळाकडील बुटांचा दर्जा व ब्रँड आणि पुणे मनपा शिक्षण मंडळाकडील बुटांचा दर्जा व ब्रँड यात तफावत असल्याचे नमूद केले आहे. पुणे मनपा शिक्षण मंडळाने प्रस्तावित केलेल्या लिबर्टी शूजचे स्पेसिफिकेशन १.८ असल्याचे व तसे अथर्व लॅब व लिबर्टी प्रयोगशाळा यांचे प्रमाणपत्र जोडले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे या तक्रारीवर विचार करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

७०) **टेंडर फॉर्म विकत घेतल्याच्या पावत्या का दिल्या जात नाहीत?**

या तक्रारीबाबत ही पद्धत पूर्वीपासून असल्याचे व जमा होणारी रक्कम त्या-त्या वेळी बँकेत भरली जात असल्याचे शिक्षण प्रमुख यांनी नमूद केले आहे. तसेच यापुढे पावती देण्याचेही लेखी नमूद केले आहे. मात्र एकंदरीत पाहता ही पद्धत योग्य नाही. यापुढे त्यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

७१) **पद्मयोग यांची ॲथोरायझेशन रद्द करण्याचे पत्र बाटाने दिल्यानंतर त्यांचे ब पाकीट का उघडण्यात आले?**

प्रकरणामध्ये बाटा कंपनीचे कलकत्ता येथील पत्र पाहता त्यांनी पद्मयोग यांना ॲथोरायझेशन रद्द केलेले दिसत नाही त्यामुळे तक्रारीचा विचार करण्याची आवश्यकता नाही.

७२) **यंत्रमाग मंडळाचा अनुभव वाईट आहे, हे कशाच्या आधारे ठरविले, जो पत्रव्यवहार केला याबाबतचा पत्रव्यवहार सादर करावा.**

याबाबत शिक्षण प्रमुख यांनी चौकशी अधिकारी यांचेशी समक्ष चर्चेत ४८००० पैकी ९४ मीटर कापड खराब निघाले असल्याचे तसेच कापडाचा पुरवठा वेळेत न केल्याचे नमूद केले आहे. सबब याबाबत अधिक उहापोह करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

७३) **विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना एकाच प्रकारच्या कापडाचे गणवेष शिलाई करण्याचा निर्णय कोणाचा आहे?**

याबाबत शिक्षण प्रमुख यांनी माहिती दिलेली नसून अशा प्रकारे इतिवृत्त ठेवले नसल्याचे नमूद केलेले आहे. आमच्या मते विद्यार्थीनींच्या सलवार कुडत्याचे कापड विद्यार्थ्यांच्या कापडापेक्षा निराळे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कापडाचे विद्यार्थीनीकरीता सलवार कुडता शिवण्याचे प्रस्तावित केले असेल तर ते चुकीचे वाटते.

७४) **सर्व पात्र ठेकेदारांचे मालक/ भागीदारांचे नांवे व पत्ते व ब पाकीटाचे दरपत्रकाच्या पाकीटांचे झेरॉक्स द्यावी.**

यासंदर्भात आमच्या मते निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वच निविदा प्रकरण हे सर्वांसाठी खुले होते व ते संकेतस्थळावर प्रसिद्धही करता येते. प्रस्तुत प्रकरणी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असे म्हणता येणार नाही. तरीही प्रकरणाचे गांभीर्य पाहून निविदा कार्यपद्धत विचारात घेवून आवश्यकतेनुसार योग्य ते कागदपत्रे मागणी केल्यास देण्यास हरकत नसावी.

**७५) पाकीट क्र. १ उघडतांना ठेकेदारांचे उपस्थितीचे नविन रजिस्टर का करण्यात आले? खुलासा करावा.**

याबाबत नविन शैक्षणिक वर्षातील खरेदी प्रक्रिया असल्याने नविन रजिस्टर ठेवण्यात आले असल्याचे शिक्षण प्रमुख यांनी खुलासा केला आहे. आम्ही जूनी व नविन अशी दोन्ही रजिस्टरे पाहिली. जुन्या रजिस्टरमध्ये ३१ मार्च २००८ ची नोंद घेतल्यानंतर ३० जुलै २००८ आणि ५ ऑगस्ट २००८ या दोन तारखांना ठेकेदारांच्या उपस्थितीची नोंद घेतल्याचे आढळून आले. नविन रजिस्टरमध्ये दि. १३ आणि १४/६/२००८ च्या उपस्थितीची नोंद केलेली आहे. उपरोक्त सर्व नोंदी पाहता नविन रजिस्टर सुरू करण्याचे प्रयोजन समजून येत नाही. त्यामुळे चौकशी अधिकारी यांनी याबाबत उपस्थित केलेली शंका रास्त वाटते.

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)**
**पुणे महानगरपालिका**